# पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.

कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४

e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in


दिनांक :– १३/०९/२०२४

## प्रेस नोट

## वाशिम जिल्हा पोलीस दलाची डि.जे. मुक्त श्रीगणेशोत्सव संकल्पना.

वाशिम जिल्हयामध्ये दि.०७.०९.२०२४ रोजी एकुण ७८४ श्रीगणेश स्थापणा झालेल्या आहेत. दि.१६.०९.२०२४ ते दि. १९.०९.२०२४ या कालावधीमध्ये श्री गणेश विसर्जन मिरवणुकांचे नियोजन करण्यात आले आहे. श्रीगणेशोत्सव व श्रीगणेश विसर्जन शांततेत पार पाडणे करीता वाशिम पोलीस दलातर्फे प्रभावी प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या आहेत.

मा.जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस व मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांनी डि.जे.मुक्त श्रीगणपती उत्सव ही संकल्पना राबवावी असे आवाहन केले आहे. ध्वनिप्रदुषन नियमावली अन्वये श्री. अनुज तारे पोलीस अधीक्षक वाशिम हे जिल्हयातील ध्वनिप्रदुषण नियमण समितीचे सक्षम अधिकारी आहेत. त्यानुसार त्यांनी ध्वनीप्रदुषण विनिमय व नियंत्रण अधिनियम २००० कलम ८ चे प्रभावी अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत.

मा. पोलीस अधीक्षक वाशिम यांनी लेजर–लाईटशो मुळे होणा–या दुर्घटना पहाता लेजर–लाईटशो ला पुर्णत: बंदीचे आवाहन केले आहे.

डॉक्टर व सामाजीक संघटनांनी ध्वनीप्रदुषण, लेझर लाईट शो मुळे सर्वसामान्य नागरीक, मुले, अबाल वृध्द यांना इजा/बाधा होवुन त्यांचे ज्ञानेंद्रीय डोळे, कान निकामी होत असल्याने डि.जे. लेजर–लाईटशो वर बंदी घालावी असे निवेदण जिल्हयातील पोलीस स्टेशन आणि मा.पोलीस अधीक्षक वाशिम यांना दिले आहे.

**जिल्हयामध्ये आज पावेतो एकुण ०९ डि.जे. धारकांवर दंडात्मक कारवाया करुन १,८५,५०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पोलीस आणि आर.टी.ओ. यांनी संयुक्तरित्या डि.जे.चे वाहनात फेरबदल, फिटनेस व ईतर वाहनातील दोषांसाठी डि.जे.चे वाहन डिटेन करुन कारवाई केली आहे. ५७ डि.जे.धारकांना ध्वनीप्रदुषण विनिमय व नियंत्रण अधिनियम २००० कलम ८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत पोलीस विभागातर्फे नोटीस देण्यात आल्या आहेत.** श्रीगणेश मंडळांना सुध्दा ध्वनी प्रदुषण होवु नये करीता नोटीस देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास डि.जे.धारकांचे सर्व परवाने रद्द करुन डि.जे धारक/मालक यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येणारे आहे.

जिल्हया बाहेरील व जिल्हयातील डि.जे. संबंधाने पोलीस व आर.टी.ओ. विभाग यांचे वतीने संयुक्त तपासणी करण्यात येणार आहे. डि.ज. व लेजर–लाईटशो मुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन पोलीस विभागातर्फे करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम